स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

आयुक्त कार्यालय
सोलापूर महानगरपालिका
इंद्रभुवन, रेल्वे लाईन, सोलापूर.४१३००१
दुरध्वनी -०२१७-२७४०३००
जा.क्र./नआ/वै/ ७४७
दि.०९ जानेवारी २०२२

# आदेश

**विषय: कोरोना विषाणू (कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत**
**संदर्भ:**

१) भारतीय साथ रोग अधिनियम १८९७.
२) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ६५ (१) (ब)
३) महाराष्ट्र शासन सार्व.आरोग्य विभागाकडील अधिसूचना क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दि.१४ मार्च २०२०.
४) क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २७/११/२०२१ रोजीचे आदेश.
५) क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक २४/१२/२०२१ रोजीचे आदेश.
६) क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ३०/१२/२०२१ रोजीचे आदेश.
७) क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ०८/०१/२०२२ रोजीचे आदेश.
८) क्रमांक: डीएमयु/२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१/ महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, मुंबई दिनांक ०९/०१/२०२२ रोजीचे आदेश.

ज्याअर्थी ओमिक्रॉन कोविड १९ व्हेरिएंटमुळे रुग्णसंख्या वेगाने वाढत आहे. या विषाणूचा प्रसारचा वेग जास्त असल्याने व पुढील काळात प्रसार जास्त होण्याची शक्यता असल्याने शासनाकडील संदर्भ क्र.७ व ८ चे आदेशानुसार कोविड १९ विषाणूचा फैलाव होण्यास प्रतिरोध करणेसाठी साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ नुसार राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत संपूर्ण राज्यात कडक निर्बंध जारी करण्याचे आदेशित करणेत आलेले आहे.

ज्याअर्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दि.१४ मार्च, २०२० अन्वये कोरोना विषाणू (काव्हीड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे, आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून, महानगरपालिका आयुक्त हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोविड -१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

त्याअर्थी, मी पि.शिवशंकर,भा.प्र.से., आयुक्त, सोलापूर महानगरपालिका, साथरोग अधिनियम १८९७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कोरोना (कोविड-१९) विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडील प्राप्त निर्देशास अनुसरुन सोलापूर शहर हद्दीत सार्वजनिक हिताच्या दृष्टिने खालील सूचना / आदेश निर्गमित करीत आहे. सदरचे निर्बंध दि.१०/०१/२०२२ चे रात्री ००.०० पासून लागू राहतील.

१) सोलापूर शहरातील खालील नमूद बाबींवर पुढील प्रमाणे निर्बंध लागू राहतील.

| क्षेत्र | लागू केलेले निर्बंध |
| --- | --- |
| नागरिकांचे बाहेर फिरणे | सकाळी ०५ ते रात्री ११.०० या कालावधीमध्ये पाच पेक्षा जास्त व्यक्तींना एकत्र येण्यास मनाई असेल. तसेच रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० या कालावधीत अत्यावश्यक कारणाशिवाय बाहेर फिरण्यास मनाई असेल. |
| शासकीय कार्यालये | अ) कार्यालय प्रमुखांच्या स्पष्ट आणि लेखी परवानगीशिवाय अभ्यगतास कार्यालयास प्रवेशास मनाई असेल.<br>ब) मुख्यालयाच्या बाहेरुन येणाऱ्या सर्व उपस्थितांची कॉन्फरंन्सद्वारे (VC) वर बैठका आयोजित कराव्यात.<br>क) कार्यालय प्रमुख हे गरजेनुसार घरुन काम करणेस प्रोत्साहन देत कार्यालयीन वेळेत कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहणाऱ्या कर्मचा-यांची संख्या कमी करणे तसेच गरजेनुसार कार्यालयीन कामकाजाच्या वेळांमध्ये बदल करणे याकरिता कर्मचाऱ्यांसाठी कामाच्या वेळांमध्ये बदलाचा विचार करु शकतील.<br>ड) कार्यालयामध्ये कोविड अनुरुप वर्तनाचे कठोर पालन होईल याबाबत कार्यालय प्रमुखांनी काळजी घ्यावी.<br>इ) सर्व कार्यालय प्रमुखांकडून थर्मल स्कॅनर, हॅंड सॅनिटायझर उपलब्ध करुन दयावे. |
| खाजगी कार्यालये | अ) कार्यालय व्यवस्थापनाने घरुन काम करणेस प्रोत्साहन देत कामकाजाच्या वेळा कमी कराव्यात. कार्यालयात पन्नास टक्क्यापेक्षा जास्त कर्मचारी उपस्थित राहणार नाहीत याची दक्षता घ्यावी. तसेच कर्मचाऱ्यांसाठी वेळांमध्ये बदल करण्याचाही विचार करतील. तसेच कार्यालये २४ तास सुरु ठेवून टप्प्याटप्प्याने काम करण्याबाबत विचार करतील. कार्यालयीन कामकामाच्या वेळा २४ तास असल्याने रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० या कालावधीत प्रवास करणे झालेस ओळखपत्र दाखवून प्रवासास परवानगी असेल. अशा प्रकारचा निर्णय घेताना महिला कर्मचाऱ्यांची सुरक्षितता आणि सोयीचा विचार करणे बंधनकारक राहील.<br>ब) केवळ पूर्ण लसीकरण झालेल्या कर्मचाऱ्यांनीच कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहणेस परवानगी असेल. लसीकरण न केलेल्या कर्मचाऱ्यांना संपूर्ण लसीकरणासाठी जाण्यासाठी प्रोत्साहित करावे.<br>क) सर्व कर्मचारी कोविड अनुरुप वर्तनाचे काटेकोरपणे पालन करतील याची कार्यालयीन व्यवस्थापनाने दक्षता घ्यावी.<br>ड) सर्व कार्यालय व्यवस्थापनाने थर्मल स्कॅनर, हॅंड सॅनिटायझर उपलब्ध करुन दयावे. |
| लग्न समारंभ | लग्न समारंभास जास्तीत जास्त ५० लोकांना उपस्थित राहणेस परवानगी असेल. तथापि, संबंधीत विभागीय कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक असेल. |
| अंत्यसंस्कार आणि अंतिम संस्कार | अंत्यसंस्कार आणि अंतिम संस्कार या कार्यक्रमाध्ये जास्तीत जास्त २० लोकांना उपस्थित राहणेस परवानगी असेल. |
| सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय संमेलन / कार्यक्रम | सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय / संमेलन/ कार्यक्रमामध्ये जास्तीत जास्त ५० लोकांना उपस्थित राहणेस परवानगी असेल. |
| शाळा, महाविद्यालेय व कोचिंग क्लासेस | शाळा, महाविद्यालये व कोचिंग क्लासेस दि.१५/०२/२०२२ रोजी पर्यंत पुर्णपणे बंद राहतील. तथापि, खालील बाबी यामधून वगळण्यात येत आहेत.<br>१) विविध शैक्षणिक बोर्डाकडून दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी राबवावयाचे |

| | |
|---|---|
| | उपक्रम<br>२) प्रशासकीय कामकाज व शिक्षकांनी अध्यापनाव्यतिरिक्त करावयाचे कामकाज.<br>३) शालेय शिक्षण विभाग, कौशल्य आणि उद्योजकता विकास विभाग, तांत्रिक आणि उच्च शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग, महिला आणि बाल विकास विभाग किंवा कोणत्याही वैधानिक प्राधिकरणाद्वारे राबविण्यात येणारे किंवा परवानगी दिलेले उपक्रम.<br>४) यानिर्बंधांना अपवादाच्या स्थितीत हे विभाग आणि प्राधिकरणांना राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांकडून परवानगी घ्यावी लागेल. |
| **जलतरण तलाव, स्पा, वेलनेस सेंटर.** | पुर्णपणे बंद राहतील |
| **जिम** | १) ५०% क्षमतेने चालू ठेवणेस परवानगी असेल. तथापि व्यायाम करताना मास्कचा वापर करणे बंधनकारक असेल.<br>२) केवळ संपूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींना त्या सेवेचा वापर करणेस परवानगी असेल.<br>३) कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे संपूर्ण लसीकरण झालेले असणे बंधनकारक राहील. |
| **केश कर्तनालये व सौंदर्य केंद्रे (ब्युटी सलून)** | १) ५०% क्षमतेने चालू ठेवणेस परवानगी असेल.<br>२) दररोज रात्री १०.०० ते सकाळी ०७.०० पर्यंत पूर्ण बंद असेल.<br>३) एकापेक्षा अधिक सुविधा असलेल्या आस्थापनांमध्ये इतर सुविधा बंद राहतील.<br>४) केश कर्तनालयामध्ये कोविड अनुरुप वर्तनाचे काटेकोरपणे पालन करावे तसेच काम करणारे सर्व व्यक्तींचे तसेच ग्राहकांचे लसीकरण पूर्ण झाले असणे बंधनकारक असेल. हे तपासण्याची सर्वस्वी जबाबदारी केश कर्तनालयाच्या मालकाची राहील.<br>५) ब्युटी सलूनमध्ये अशीच सेवा देण्यात येईल ज्यात तोंडावरील मास्क काढणे आवश्यक नसेल.<br>६) अशी सेवा घेणारे व्यक्तीचे व यात काम करणाऱ्या सर्व व्यक्तीचे पूर्ण लसीकरण झालेले असावेत. |
| **खेळांचे स्पर्धा** | १) आधीच नियोजित केलेल्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा खालील अटीवर आयोजित करणेस परवानगी राहील. तसेच इतर स्पर्धा पुढे ढकलण्यात येतील.<br>अ) प्रेक्षकांना उपस्थित राहणेस बंदी असेल.<br>ब) सर्व खेळाडू आणि अधिकारी यांच्या हालचाली बायो-बबलमध्ये असतील.<br>क) सहभागी होणाऱ्या सर्व आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत खेळाडू यांना भारत सरकारचे कोविड अनुरुप नियमांचे पालन करणे बंधनकारक राहतील.<br>ड) खेळाडू आणि अधिकारी यांची RAT-RTPCR चाचणी प्रत्येक तिसऱ्या दिवशी घेणे बंधनकारक असेल.<br>२) शहर किंवा जिल्हास्तरीय क्रिडा शिबिरे/स्पर्धा/कार्यक्रमे आयोजित करणेस मनाई असेल. |
| **मनोरंजन उद्याने, प्राणीसंग्रहालय, वस्तु संग्रहालये, किल्ले आणि अन्य सशुल्क ठिकाणे / कार्यक्रम, स्थानिक पर्यटन स्थळे** | पुर्णपणे बंद राहतील. |

| | |
|---|---|
| **शॉपिंग मॉल, बाजार समिती, भाजीपाला मार्केट व आठवडी बाजार.** | अ) ५०% क्षमतेने चालू राहतील. संबंधीत आस्थापनांनी पूर्ण क्षमतेची माहिती तसेच वर्तमान अभ्यागतांची संख्या सर्व अभ्यागतांच्या माहितीसाठी आस्थापनाच्या बाहेरील सूचना फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.<br>ब) अभ्यागत व कर्मचारी यांचेकडून कोविड अनुरुप वर्तनाचे कठोर पालन होईल याची दक्षता घेण्यासाठी आस्थापनांनी मार्शल्स नेमावेत.<br>क) RAT टेस्टिंग बूथ / किऑस्क ठेवावेत.<br>ड) पुर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींनाच प्रवेशास परवानगी राहील.<br>ई) रात्री १०.०० ते सकाळी ०८.०० या कालावधीत संबंधीत आस्थापना पुर्णपणे बंद राहतील.<br>फ) भाजीपाला /फळ विक्रेते, दुकानदार व आठवडी बाजारमधील विक्रेते यांचे लसीचे दोनही डोस घेतलेले असणे आवश्यक आहे. तसेच दि.१० ते १४ जानेवारी २०२२ पर्यंत चाचणी करुन घेणे बंधनकारक राहील. याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीस दि.१५/०१/२०२२ पासून र.रु.१,०००/- इतका दंड करणेत येईल. |
| **रेस्टॉरंट, उपहारगृहे** | अ) ५०% क्षमतेने चालू राहतील. संबंधीत आस्थापनांनी पूर्ण क्षमतेची माहिती तसेच वर्तमान अभ्यागतांची संख्या सर्व अभ्यागतांच्या माहितीसाठी आस्थापनाच्या बाहेरील सूचना फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.<br>ब) पुर्णपणे लसीकरण झालेल्या व्यक्तीनांच प्रवेश परवानगी राहील.<br>क) रात्री १०.०० ते सकाळी ०८.०० या कालावधीत संबंधीत आस्थापना पूर्णपणे बंद राहतील. सर्व दिवस सकाळी ०७.०० ते रात्री ११.०० वा. पर्यंत घरपोच सुविधा चालू ठेवणेस परवानगी असेल. तसेच पार्सल सुविधा देणारे कर्मचारी यांचे पूर्ण लसीकरण झालेले असणे बंधनकारक आहे. |
| **नाट्यगृह, सिनेमा थिएटर्स** | अ) ५०% क्षमतेने चालू राहतील. संबंधीत आस्थापनांनी पूर्ण क्षमतेची माहिती तसेच वर्तमान अभ्यागतांची संख्या सर्व अभ्यागतांच्या माहितीसाठी आस्थापनाच्या बाहेरील सूचना फलकावर प्रदर्शित करणे बंधनकारक राहील.<br>ब) पुर्णपणे लसीकरण झालेल्या व्यक्तीनांच प्रवेश परवानगी राहील.<br>क) रात्री १०.०० ते सकाळी ०८.०० या कालावधीत संबंधीत आस्थापना पूर्णपणे बंद राहतील. |
| **आंतरराष्ट्रीय प्रवास** | भारत सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार आंतरराष्ट्रीय प्रवासास परवानगी असेल. |
| **देशांतर्गत प्रवास** | कोविडरोधी दोन लसी किंवा राज्यात प्रवेश करण्याआधी ७२ तासापूर्वीपर्यंत आरटीपीसीआर चाचणीचा निगेटिव्ह अहवाल प्रवास करणेस ग्राह्य धरण्यात येईल. हे हवाई, रेल्वे आणि रस्ते या तिन्ही मार्गांनी प्रवास करणाऱ्या प्रवाशांना लागू राहील. प्रवास करणारे वाहनचालक, वाहक आणि अन्य सह्योगी कर्मचाऱ्यांनाही लागू राहील. |
| **माल वाहतूक, औद्योगिक उपक्रम, बांधकाम उपक्रम** | माल वाहतूक, औद्योगिक उपक्रम, बांधकाम उपक्रम फक्त पूर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींद्वारे नियमित वेळेनुसार चालू ठेवणेस परवानगी राहील. |
| **सार्वजनिक वाहतूक** | नियमित वेळेनुसार पुर्ण लसीकरण झालेल्या व्यक्तींना प्रवास करणेस परवानगी राहील. |
| **UPSC/MPSC/वैधानिक प्राधिकरण/सार्वजनिक संस्था इत्यादीद्वारे परीक्षांचे आयोजन** | अ) राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या सर्व स्पर्धा परीक्षा भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार पार पाडल्या जातील. अशा परीक्षासाठीचे प्रवेशपत्र यासाठीच्या प्रवासाची अत्यावश्यक सिध्द करण्यास पुरेसे असेल.<br>ब) राज्यस्तरावर आयोजित सर्व स्पर्धात्मक परीक्षा जेथे हॉल तिकीट आधीच जारी केले गेले आहेत आणि परीक्षेच्या तारखा आधीच निश्चित करण्यात आलेल्या आहेत त्या अधिसूचनेनुसार पार पाडतील. अन्य सर्व परीक्षा राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांच्या मंजूरीनंतरच पार पाडल्या जातील.<br>क) परीक्षेचे आयोजन कोविड अनुरुप वर्तन मार्गदर्शक तत्वानुसार केले जाईल. |

**२) खालील बाबींचा प्रवासासाठी अत्यावश्यक असणाऱ्या कारणांमध्ये समोवश असेल -**
I) वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती.
ii) अत्यावश्यक सेवा (सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील सर्व सेवा)
iii) विमानतळ, रेल्वे स्थानक, बस स्थानक येथून वैध तिकिटासह प्रवास करता येईल. तसेच परवानगी देणेत आलेल्या स्पर्धा परिक्षांचे प्रवेशपत्रासह प्रवास करता येईल.
iv) २४ तास सुरु असणाऱ्या कार्यालयासाठी, विविध शिफ्टमध्ये काम करण्यासाठी तेथील कर्मचाऱ्यांचा प्रवास अत्यावश्यक मानला जाईल.
**३) सोबत जोडलेल्या परिशिष्ट ब मधील कोविड अनुरुप वर्तनाचे पालन करणे सर्व व्यक्तींवर बंधनकारक असेल.**

३) **दुकाने, रेस्टॉरंट, हॉटेल किंवा e-commerce, मध्ये गुंतलेल्या कोणत्याही आस्थापनामध्ये काम करणारे कर्मचारी तसेच होम डिलिव्हरी करणारे कर्मचारी यांचे पूर्ण लसीकरण केलेले असणे बंधनकारक असेल. वरील बाबी तपासण्याची सर्व जबाबदारी संबंधीत आस्थापना / व्यवस्थापनावर राहील व त्यांस संबंधीत व्यवस्थापनास जबाबदार धरले जाईल. सदर बाबींचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापना ७ दिवस बंद करणेत येतील.**

४)

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती / संस्था अथवा संघटना यांचेवर भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतूदीनुसार दंडनीय / कायदेशीर कारवाईस पात्र असून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, साथ रोग नियंत्रण कायद्यातील तरतूदी आणि इतर कायदे आणि विनियम यानुसार कारवाई करणेत येईल. अशा व्यक्ती, संस्था अथवा संघटना यांचे विरुध्द संबंधीत पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी / विभागीय अधिकारी व अधिनस्त कर्मचारी यांनी कारवाई करावी.

**सदरचा आदेश आज दि.०९/०१/२०२२ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.**

**स्थळ :- सोलापूर**
**दिनांक:- ०९/०१/२०२२**

( पि.शिवशंकर,भा.प्र.से.)
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका.

**प्रति,**
**१) अति.आयुक्त, सो.म.पा.**
**२) सर्व उपायुक्त, सो.म.पा.**
**३) सर्व सहा.आयुक्त, सो.म.पा.**
**४) सर्व वैद्यकीय अधिकारी / मुख्य वैद्यकीय अधिकारी सो.म.पा.**
**५) सर्व वरिष्ठ पोलिस निरीक्षक, शहर हद्दीतील सर्व पोलिस ठाणे, सोलापूर.**
**६) सर्व खाते / शाखा प्रमुख, सोलापूर महानगरपालिका.**
**७) महानगरपालिका हद्दीतील सर्व शासकीय कार्यालय प्रमुख**

**प्रत :- माहितीस्तव सादर..**
**१) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे**
**२) मा.जिल्हाधिकारी,सोलापूर**
**३) मा.पोलीस आयुक्त,सोलापूर**

**प्रत :- जनसंपर्क अधिकारी,**
**सदरचा आदेशाची माहिती सर्व नागरिकांना होणेसाठी त्यास व्यापक प्रसिध्दी देणेत यावी.**

## परिशिष्ट "अ"
## अत्यावश्यक सेवा

**अत्यावश्यक सेवामध्ये खालील बाबींचा समावेश असेल-**

१. रुग्णालये, निदान केंद्र (Diagnostic Centers) दवाखाने, लसीकरण केंद्र, वैद्यकीय विमा कार्यालये, औषध दुकाने (Pharmacies) औषध कंपन्या, इतर वैद्यकीय आणि आरोग्य सेवा व सदर सेवा पुरविणारी उत्पादक केंद्रे, वाहतूक व पुरवठा साखळीस परवानगी असेल, लस, सॅनिटायझर, मास्क व वैद्यकीय उपकरणे व अशा सेवांना लागणार कच्चा माल व त्याच्याशी संबंधीत उत्पादन व वितरण.
२. व्हेटरीनरी हॉस्पिटल, ॲनिमल केअर शेल्टर्स व पेट फुड शॉप्स.
३. वनविभागाने घोषित केल्यानुसार वनाशी संबंधीत सर्व कामकाज
४. एव्हिएशन आणि संबंधीत सेवा (एअरलाइन्स, विमानतळ, देखभाल, कार्गो, ग्राउंड सेवा, खानपान, इंधन, सुरक्षा इ.)
५. किराणा माल, भाजीपाला दुकाने, फळ विक्रेते, दुग्धशाळा, बेकरी, मिठाई, मटन, चिकन, अंडी, मासे दुकाने, कच्चे प्रक्रिया केलेले / शिजवलेले अन्न विकणारी सर्व प्रकारची खाद्य दुकाने.
६. कोल्ड स्टोअरेज आणि गोदामे सेवा
७. सार्वजनिक वाहतूक - विमान, रेल्वे, टॅक्सी, ऑटो आणि सार्वजनिक बस.
८. विविध देशांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांच्या कार्यालयांच्या कामकाजाशी संबंधीत सेवा
९. स्थानिक प्राधिकरणांकडून मान्सूनपूर्व उपक्रम.
१०. स्थानिक प्राधिकरणांद्वारे सर्व सार्वजनिक सेवा.
११. भारतीय रिझर्व्ह बँक आणि आरबीआयने आवश्यक म्हणून नियुक्त केलेल्या सेवा
१२. SEBI ची सर्व कार्यालये मान्यताप्राप्त बाजार पायाभूत सुविधा संस्था जसे की स्टॉक एक्सचेंज, डिपॉझिटरीज, क्लिअरिंग कॉर्पोरेशन आणि SEBI मध्ये नोंदणीकृत इतर मध्यस्थ
१३. दूरसंचार सेवांच्या पुनर्सचयित / देखभालीसाठी आवश्यक सेवा
१४. माल वाहतूक
१५. पाणी पुरवठा सेवा
१६. शेती संबंधी उपक्रम, बियाणे, खते, उपकरणे व त्याची दुरुस्ती यासह कृषी क्षेत्राचे अखंड निरंतरता सुनिश्चित करणसाठी आवश्यक असणारी कृषी संबंधीत क्रियाकलाप आणि त्याशी संबंधीत संलग्न उपक्रम
१७. सर्व वस्तुंची निर्यात-आयात
१८. ई-कॉमर्स (केवळ आवश्यक वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्यासाठी)
१९. मान्यताप्राप्त माध्यम
२०. पेट्रोल पंप आणि पेट्रोलिअम संबंधीत उत्पादने - ऑफशोर /ऑनशोर उत्पादनासह
२१. सर्व मालवाहू सेवा
२२. डेटा सेंटर क्लाऊड सर्व्हिसेस IT सेवा गंभीर पायाभूत सुविधा आणि सेवांना समर्थन देणारी
२३. सरकारी आणि खाजगी सुरक्षा सेवा
२४. इलेक्ट्रिक आणि गॅस पुरवठा सेवा
२५. एटीएम सेवा
२६. पोस्टल सेवा
२७. कस्टम हाऊस एजंट्स / परवानाकृत मल्टि मोडल ट्रान्सपोर्ट ऑपरेटर जे लस / जीवनावश्यक औषधे / फार्मास्युटिकल उत्पादनांच्या हालचालीशी संबंधीत आहेत.
२८. कोणत्याही अत्यावश्यक सेवेसाठी कच्चा माल, पॅकेजिंग सामग्रीची निर्मिती करणारे घटक.
२९. व्यक्तींसाठी तसेच संस्थासाठी पावासाळ्याच्या हंगामासाठी साहित्याचा उत्पादनामध्ये गुंतलेली यंत्रणा.
३०. केंद्रीय, राज्य, स्थानिक सरकारी कार्यालये त्यांच्या वैधानिक प्राधिकरण आणि संस्थासह
३१. सहकारी, PSU आणि खाजगी बँका
३२. अत्यावश्यक सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांची कार्यालये सह

३३. विमा / मेडिकल कंपनी
३४. फार्मास्युटिकल कंपन्यांची उत्पादन / वितरण व्यवस्थापन कार्यालये.
३५. रिझर्व्ह बँकेने स्टँन्ड अलोन प्राइमरी डीलर्स, सीसीआयएल, एनपीसाआय, पेमेंट सिस्टम ऑपरेटर आणि आरबीआयएच्या नियमन केलेल्या बाजारपेठेत कार्यरत वित्तीय बाजारातील सहभागीसह घटक आणि मध्यस्थ
३६. सर्व नॉन बँकिंग फायनान्सिअल कॉर्पोरेशन
३७. सर्व मायक्रोफायनान्स संस्था
३८. न्यायालये, चौकशी आयोगाच्या जमातींच्या कामकाजाचे अधिकारी
३९. स्थानिक आपत्ती व्यवस्थापनाद्वारे अत्यावश्यक सेवा म्हणून नियुक्ती केलेल्या कोणत्याही सेवा

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका

## परिशिष्ट "ब"
## कोविड अनुरुप वर्तन (CAB)

कोविड अनुरुप वर्तन ची व्याख्या ही कोविड १९ विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आणि त्याव्दारे तयाच्या प्रसाराची साखही खंडित करण्यासाठी व्यक्ती आणि संस्थांना आवश्यक असलेले दैनंदिन सामान्य वर्तन म्हणून केले जाऊ शकते. कोविड अनुरुप वर्तनामध्ये खाली नमूद केलेल्या गोष्टींचा समावेश आहे. आणि कोविड १९ विषाणूच्या प्रसारात अडथळा आणू शकरणाऱ्या अशा सर्व तर्कसंगत बाबींचा समावेश आहे, ज्याचा प्रसार करण्याची पध्दत येथे दर्शविली आहे.

१) मूलभूत कोविड अनुरुप वर्तनात खालील बाबींचे प्रत्येक वेळी प्रत्येक जणाने पालन करणे आवश्यक आहे.
२) नेहमी योगय पध्दतीने मास्क परिधान करा. मास्कने नेहमी नाक आणि तोंड झाकले पाहिजे. (रुमाल मास्क म्हणून गणला जाणार नाही आणि वापरणारी व्यक्ती दंडास जबाबदार असेल.)
३) जिथे शक्य असेल तिथे नेहमीच सामाजिक अंतर (६ फूट अंतर) राखा.
४) साबणाने किंवा सॅनिटायझरने वारंवर आणि स्वच्छपणे हात धुवा.
५) साबणाने हात न धुता किंवा सॅनिटायझर न वापरता नाक/डोळे/तोंडाला स्पर्श करणे टाळा.
६) योग्य श्वसन स्वच्छता (आरोग्य) राखा.
७) वारंवार साफ केलेले पृष्ठभाग नियमितपणे स्वच्छ आणि निर्जतुक करा.
८) खोकताना किंवा शिंकताना, टिश्यू पेपर वापरुन तों आणि नाक झाकून अका आणि वापरलेले टिश्यू पेपर नष्ट करा. जर एखादयाकडे टिश्यू पेपर नसेल त्याने हाताच्या कोपरावर नाक व तोंड ठेवून खोकावे किंवा शिंकावे.
९) सार्वजनिक ठिकाणी थुंकू नका.
१०) आवश्यतेशिवाय घराबाहेर पडणे टाळा.
११) गर्दी टाळा आणि सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित अंतर (६ फूट अंतर) ठेवा.
१२) शारिरीक संपर्काशिवाय कोणालाही नमस्कार करा.
१३) कोविड-१९ विषाणूचा प्रसार टाळण्यासाठी आवश्यक असलेली इतर कोणतेही तर्कशुध्द वर्तणूक, त्याची प्रसाराची कार्यपध्दती लक्षात घेऊन वर्तन करावे.

### अ) कामाच्या ठिकाणी कोविड अनुरुन वर्तन (CAB)

१) वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशात निर्धारित केलेल्या संख्येएवढीच कामाच्या ठिकाणी कोणत्याही शिफ्टमध्ये उपस्थित कामगार/कर्मचारी यांची संख्या असेल.
२) या कलमामध्ये नमूद केल्याप्रमाणे कोविड अनुरुप वर्तनाचे पालन प्रत्येकाकडून केले जाईल. आणि वर नमूद केलेल्या संस्थेच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यांच्या आकलन क्षमतेचा पूर्वगृह न ठेवता मालक / संस्था कामाच्या ठिकाणी गुंतलेल्या प्रत्येक व्यक्तिच्या कोविड अनुरुप वर्तनासाठी जबाबदार असेल. कामाच्या ठिकाणी सामाजिक अंतर, शिफ्टमधील पुरेशा अंतराव्दारे, कर्मचाऱ्यांच्या जेवणाच्या ब्रेकमधील अंतर इत्यादीव्दारे सुनिश्चित करावे. जर तेथे खादय पदार्थाची व्यवस्था किंवा स्थान असेल तर, त्या भोजनालयासाठी SOP चे पालन आवश्यक आहे. हालाचालीच्या वेळेवर निर्बंध असल्यास कोणत्याही शिफ्टमध्ये कमी गर्दी सुनिश्चित करण्यासाठी तसेच काम बंद झाल्यामुळे प्रभावित झालेल्या कामाच्या अनुशेषाच्या उद्देशाने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण म्हणजेच DDMA च्या परवानगीने शिफ्टची संख्या वाढविता येईल.
३) थर्मल स्कॅनिंग, हँडवॉश आणि सॅनिटायझरची व्यवस्था प्रवेशाच्या आणि बाहेर पडण्याच्या सर्व ठिकाणावर आणि सामान्य भागात करावी. याव्यतिरीक्त कामाच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात हॅन्ड वॉश आणि सॅनिटायझर उपलब्ध करुन दयावे.

४) संपूर्ण कार्यस्थळ सामान्य सुविधा आणि मानवी संपर्कात येणार सर्व ठिकाणे वारंवार स्वच्छ करावी. उदा. शिफ्ट दरम्यान दरवाजाचे हॅन्डल इत्यादी.
५) आरोग्य सेतू ॲपचा वापर खाजगी आणि सार्वजनिक अशा सर्व कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य आहे.
६) कोविड-१९ रुग्णावर उपचार करण्यासाठी अधिकृत असलेल्या जवळपासच्या भागातील ओळखली जाणारी रुग्णालये / दवाखाने यांची यादी कामाच्या ठिकाणी उपलब्ध करुन दयावी. कोविड-१९ ची कोणतीही लक्षणे दिसणाऱ्या कर्मचाऱ्यांना अशा सुविधांमध्ये तात्काळ तपासणीकरीता पाठवावे. लक्षणे दिसणाऱ्या कर्मचाऱ्यांना वैद्यकिय सुविधामध्ये हालविले जाईपर्यंत वेगळे ठेवणेसाठी कोरंटाईन क्षेत्र निश्चित करावे.

**ब) मेळावे (कोविड अनुरुप वर्तन)**

**लग्नसमारंभ**

अ) जास्तीत जास्त पाहुण्यांची संख्या तसेच एकत्र येण्याचे तास यांचे वेळेप्रमाणे नियोजन करावे.
ब) उपस्थित तसेच सेवाप्रदाते यांनी संपुर्ण समारंभात अनिवार्यपणे मास्क घालणे आणि सामाजिक अंतर राखणे याप्रमाणे कोविड अनुरुप वर्तण करणे आवश्यक आहे.
क) अन्न पदार्थाचे वाटप अशा प्रकारे केले पाहिजे की, ज्यामुळे जास्त व्यक्तिचा संपर्क होणार नाही आणि भोजनालय आणि रेस्टारंट यांनी सामन्यत: मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे.मार्गदर्शक तत्वांच्या शिवाय अन्न पदार्थांचे क्षेत्रात कोणत्याही वेळी क्षमतेच्या ५० टक्के इतकेच अतिथींना सेवा देण्यात यावी.
ड) विवाहस्थळाच्या मालकी असलेल्या संस्थांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्याच्या सामान्यतेचा पुर्वगृह न ठेवता पाहुण्यांसाठी पुरेसे हॅन्डसनिटायझर, थर्मल स्कॅनर उपलब्ध करुन दयावे. सफाई कर्मचारी आणि खानपान कर्मचाऱ्यांसह सर्व कर्मचाऱ्यांचे लसीकरण पुर्ण असणे बंधनकारक असेल.
इ) जर कर्मचारी सदस्य वैध चाचणी न करता आढळल्यास निर्देशाचे पालन न करणाऱ्यावर तसेच त्याच्या आस्थापनेकडून दंड आकारला जाईल. या नियमाचे कोणाकडूनही उल्लंघन झाल्यास वर आणि वधूचे कुंटूंब आणि आस्थापनावर दंड आकारला जाऊ शकतो. वारंवार अशी चुक केल्यास कोविड-१९ ची केंद्रसरकारची सुचना अमलात असे पर्यंत अशी आस्थापना बंद करण्यात येईल.

**अंत्यसंस्कार व अंतिम संस्कार**

अ) सर्व उपस्थित लोकांनी तसेच सेवा पुरविणाऱ्या प्रदाते यांनी मास्क घालणे अनिवार्य असुन संपूर्ण विधी दरम्यान सामाजिक अंतर राखून कोविड प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करावे.
ब) स्थानिक प्राधिकरण / संस्था / व्यवस्थापन ज्यांच्याकडे आस्थापनेची जबाबदारी असेल ते कोविड अनुरुप वर्तनाचे पालन सुनिश्चित करण्यासाठी जबाबदार राहतील.
क) परवानगी असलेली कमाल संख्या हि वेळोवेळी निश्चित केलेल्या नियमानुसार असेल.

**इतर सामाजिक, धार्मिक, निवडणूक, करमणूक किंवा सांस्कृतिक मेळावे.**

अ) या मेळाव्यासाठी आवश्यक परवानगी तसेच जास्तीत जास्त उपस्थित संख्येची परवानगी हि वेळोवेळीच्या नियमानुसार असेल.
ब) भोजन दिले जात असल्यास, त्याचा विभाग स्वतंत्रपणे दर्शवून भोजनालयासाठी असलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे लागेल. जर सदर क्षेत्रात निर्बंध लागू असतील तर अशा ठिकाणच्या कोणत्याही मेळाव्यात भोजन दिले जाणार नाही.
क) सर्व उपस्थित तसेच सेवा प्रदाते यांनी मास्क वापरणे अनिवार्य असून, संपूर्ण कार्यक्रमामध्ये सामाजिक अंतर राखावे त्याच प्रमाणे कोविड प्रतिबंधात्मक वर्तनाचे पालन करावे.
ड) सदर क्षेत्राची मालकी असणारी व्यक्ती आयोजनामध्ये होणाऱ्या कोविड अनुरुप वर्तनासाठी जबाबदार राहिल.
इ) निवडणूकीशी संबंधित मेळावे किंवा उपक्रम आयोजित करताना, निवडणूक अधिकारी हे सदर मेळाव्यास / उपक्रमास उपस्थित व्यक्तिंची संख्या सुनिश्चित करतील.

### क) सार्वजनिक आणि खाजगी वाहतूकीत कोविड अनुरुप वर्तन

**टॅक्सी, ॲटोरिक्षा आणि इतर खाजगी वाहतूक ऑपरेटरसाठी (बस / रेल्वे वगळता)**

अ) सर्व टॅक्सी, ॲटोरिक्षा आणि इतर खाजगी वाहतूक ऑपरेटर (बस वगळता) स्वतःची आणि प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक प्रवासानंतर वाहने स्वच्छ करतील.
ब) कोणतीही व्यक्ती मास्कशिवाय प्रवास करताना आढळयास / योग्यरित्या मास्क न घातल्यास ती कृती उल्लंघन समजण्यात येईल. उल्लंघन करणार प्रवासी व वाहनचालकाला या नियमानुसार दंड आकारला जाईल.

**बसेस**

अ) बस प्रवासासाठी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार परवानगी दिलेल्या क्षमतेने प्रवास करु शकतील.
ब) मास्क नसलेले किंवा कोविड अनुरुप वर्तन करणाऱ्या प्रवाशाला बस मधून खाली उतरवावे.
क) सार्वजनिक वाहतूक प्राधिकरणाना या नियमानुसार दंड आकारण्याचा अधिकार आहे. सार्वजनिक वाहतूक अधिकारी यांनी प्रवासादरम्यान व्यक्ति / प्रवाशाकडून कोविड प्रतिबंधात्मक वर्तनाचे कठोर पालन केले जाईल याची दक्षता घ्यावी.

**३. रेल्वे:**

I) सर्व प्रवाशांनी वर नमूद केलेल्या कोविड अनुरुप वर्तनाचे अनिवार्यपणे पालन करावे. प्रवास करणेसाठी स्वतंत्र युनिव्हर्सल पास सोबत बाळगणे आवश्यक आहे.
ii) मास्क नसलेले / मास्क घातलेले नसलेले किंवा कोविड अनुरुप वर्तनाचे उल्लंघन करणाऱ्या प्रवाशांना रेल्वेमधून उतरवावे.
iii) सार्वजनिक वाहतूक प्राधिकरणांना या नियमानुसार दंड आकारण्याच्या अधिकार आहे. सार्वजनिक वाहतूक अधिकारी यांनी प्रवासादरम्यान व्यक्ती / प्रवाशांकडून कोविड अनुरुप वर्तनाचे कठोर पालन केले जाईल याची दक्षत घ्यावी.
iv) आउट-स्टेशन गाड्यांच्या बाबतीत, सर्व प्रवाशांनी अनिवार्यपणे मास्क घालणे आवश्यक आहे आणि सामान्य डब्यात उभे राहणेस परवानगी दिली जाणार नाही. त्याचे पालन न केल्याबद्दल उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना रुपये ५००/ इतका दंड आकारला जाईल.

**४. खाजगी कार:**

अनेक व्यक्तींनी (एकाच कुटुंबातील प्रवासी वगळता) खाजगी कारमधून प्रवास करताना, योग्य मास्क परिधान करणे अनिवार्य आहे. स्थानिक आपत्ती व्यवस्थापनाद्वारे त्याचे उल्लंघन केल्यास दंड आकारणी केला जाईल.

### ड) दुकाने / मॉल / थिएटर्स आणि इतर अशा स्वतंत्र किंवा मल्टी-आउटलेट आस्थापना:

१. ही फक्त अशा वेळेत आणि वेळोवेळी विविध आदेशाद्वारे परवानगी असलेल्या दिवसामध्ये खुली असतील.
२. संबंधीत आस्थापना त्यांच्या सर्व अभ्यागत तसेच कर्मचारी सदस्यांद्वारे कोविड अनुरुप वर्तनाचे पालन होईल याबाबत दक्षता घेतील. जर कोणताही कर्मचारी मास्क नसलेला आढळल्यास किंवा येथे विहित केलेल्या कोविड अनुरुप वर्तनाचे किंवा राज्य आपत्ती व्यवस्थापनाद्वारे जारी केलेल्या कोणत्याही मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केलेले आढळल्यास, या नियमांनुसार दुकान मालकासह कर्मचारी सदस्यास दंड आकारला जाईल. जर कोणताही ग्राहकाने कोविड अनुरुप वर्तनाचे उल्लंघन

केल्यास, तर त्याला आस्थापनेद्वारे सेवा दिली जाणार नाही आणि सेवा देत असल्याचे आढळल्यास उल्लंघन करणाऱ्या ग्राहकांवर दंडासह, आस्थापनाच्या मालकालाही दंड आकारला जाईल. वारंवार उल्लंघन केल्यास कोविड १९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, संबंधीत आस्थापनाचा परवाना किंवा परवानगी काढून घेतली जाईल.

**ई) शास्ती:-**

१. या नियमानुसार अपेक्षित असलेल्या कोविड अनुरुप वर्तनाचे पालन न करणाऱ्या कोणत्याही व्यक्तींला, असा कसूर केल्याच्या प्रत्येक प्रसंगी, रुपये ५००/- इतका दंड करण्यात येईल.
२. ज्यांनी आपले अभ्यागंत, ग्राहक, इत्यादीवर कोविड अनुरुप वर्तन लादणे अपेक्षित आहे. अशा संस्थेच्या किंवा आस्थापनेच्या कोणत्याही परिवास्तूत (जागेत) जर एखाद्या व्यक्तीने कसूर केल्याचे दिसून आले तर, त्या व्यक्तीवर दंड लादण्याव्यतिरिक्त, अशा संस्थाना किंवा आस्थापनांना सुध्दा रुपये १०,०००/- इतका दंड करण्यात येईल. जर कोणतीही संस्था किंवा आस्थापना, तिचे अभ्यागत, ग्राहक, इत्यादीमध्ये कोविड अनुरुप वर्तन विषयक शिस्त निर्माण करण्याची सुनिश्चित करण्यात नियमितपणे कसूर करीत असल्याचे दिसून आले तर, एक आपत्ती म्हणून कोविड१९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, अशी संस्था किंवा आस्थापना बंद करण्यात येईल.
३. जर एखाद्या संस्थेने किंवा आस्थापनेने स्वत:च कोविड अनुरुप वर्तनाचे (CAB) किंवा प्रमाण कार्यचालन कार्यपध्दतीचे (SOP) पालन करण्यात कसूर केली तर, प्रत्येक प्रसंगी, रुपये ५०,०००/- इतक्या दंडास पात्र असेल. वारंवार उल्लंघन केल्यास कोविड १९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत, संबंधीत आस्थापनाचा परवाना किंवा परवानगी काढून घेतली जाईल.
४. जर कोणत्याही टॅक्सीमध्ये किंवा खाजगी वाहतूक करणाऱ्या चारचाकी वाहनात किंवा कोणत्याही बसमध्ये, कोविड अनुरुप वर्तनात कसूर केली जात असल्याचे आढळून आले तर, कोविड अनुरुप वर्तनात कसूर करणाऱ्या व्यक्तींना, रुपये ५००/- इतका दंड करण्यात येईल. तसेच सेवा पुरविणारे वाहनचालक, मदतनीस, किंवा वाहक यांना देखील रुपये ५००/- इतका दंड करण्यात येईल. बसेसच्या बाबतीत, मालक परिवहन एजन्सीस, कसुरीच्या प्रत्येक प्रसंगी, रुपये १०,०००/- इतका दंड आकारण्यात येईल. वारंवार कसूर केल्यास, एक आपत्ती म्हणून कोविड १९ ची अधिसूचना अंमलात असेपर्यंत मालक एजन्सीचे लायसन्स काढून घेण्यात येईल किंवा तिचे परिचालन बंद करण्यात येईल.
५. वारंवार, गंभीर किंवा दुष्ट हेतूने केलेल्या उल्लंघनाच्या बाबतीत इंडियन पिनल कोड, कलम १८८ व्यतिरिक्त इंडियन पिनल कोड कलम २६९/२७० नुसार संबंधीत व्यक्ती / आस्थापना मालक यांना अटक आणि तुरुंगवास केला जाऊ शकतो.

कोविड अनुरुप वर्तणूकी संबंधीच्या वर नमूद केलेल्या नियमांचे अनिवार्यपणे पालन करणेत येईल आणि त्याचे उल्लंघन केल्यास वर नमूद केलेनुसार दंड व शास्ती करणेत येईल. तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ नुसार कोणत्याही आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाद्वारे उल्लंघन करणाऱ्यावर इतर कोणताही दंड किंवा शास्ती लादता येईल. कोविड अनुरुप वर्तनाचे नियम / धोरणे वरील प्रमाणे असतील. आणि त्यामध्ये विशेषत: नमूद न केलेले कोविड अनुरुप वर्तनाशी संबंधीत असणारे इतर कोणतेही विषय / मुद्दे या कार्यालयाकडून काढणेत आलेल्या व अंमलात असलेल्या प्रचलित नियमानुसार / आदेशानुसार असतील.

(पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका